आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
प्रादेशिक बातम्या
सकाळी 7 वा. 10 मि.

दिनांकः 05.08.2020 वारः बुधवार

## ठळक बातम्या

- मुसळधार पावसामुळे मुंबईसह कोकणातलं जनजीवन विस्कळित.
- राम मंदिराच्या भूमिपूजनाचा मुहूर्त आज, अयोध्या नगरी सजली.
- गणेशोत्सवाला कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी एसटी धावणार.
- केंद्रीय लोकसेवा आयोगानं घेतलेल्या नागरी सेवा परीक्षेचा निकाल जाहीर.
- माजी मुख्यमंत्री काँग्रेसचे शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचं निधन.

आणि

- कोकण किनाऱ्यावर आजही जोरदार वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा.

**पाऊस पूर**

हवामान खात्यानं वर्तवलेला अंदाज खरा ठरवत पावसानं काल मुंबईसह कोकण आणि मध्य महाराष्ट्रात दमदार हजेरी लावली. मुंबईत संततधार पाऊस कोसळत होता, त्यामुळे सखल भागात पाणी भरल्यानं वाहतूक व्यवस्था कोलमडली. हिंदमाता, दादर टिटी, कुर्ला, माटुंगा, गव्हाणपाडा, चेंबूर, अंधेरी अग्निशमन केंद्र, वर्सोवा, दहिसर, बोरिवली, धारावी, वरळी, कांदिवली आदी ठिकाणी पाणी भरले होतं. कुर्ला नेहरू नगरमध्ये तसंच गोरेगावच्या मोतीलाल नगरात नागरिकांच्या घरात पाणी शिरलं. मुंबईतील सबवेमध्ये पाणी भरलं होतं. पुराच्या पाण्यात अनेक गाड्या बंद पडल्या. रेल्वे वाहतुकही विस्कळित झाली होती. त्यामुळे मंत्रालयासह शासकीय कार्यालयांना काल सुट्टी देण्यात आली.

मुंबईत गोराई इथं काल एक नाव समुद्रात उलटली. त्यातल्या 13 पैकी 11 मासेमारांना वाचवलं असून दोनजण बेपत्ता असल्याचं पोलिसांनी सांगितलं. सांताक्रूज इथं एक महिला आणि तिची दोन मुलं नाल्यात वाहून गेली. धोबिघाट इथं काल सकाळी ही दुर्घटना घडली. ठाण्यात घोडबंदर मार्गावर ओवळा इथं विजेच्या खांबाला धक्का लागून एकाचा मृत्यू झाला. मुसळधार पावसामुळे कांदिवली इथं पश्चिम द्रुतगती मार्गावर काल सकाळी दरड कोसळली. त्यामुळे त्या मार्गावरची वाहतूक ठप्प झाली. मुसळधार पावसामुळे मुंबई उच्च न्यायालयात काल, व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे होणार असलेल्या, विविध प्रकरणांच्या सुनावण्या स्थगित कराव्या लागल्या. त्यात सुशांत सिंग राजपूत आत्महत्या, एल्गार परिषद इत्यादी प्रकरणांचा समावेश होता.

मुसळधार पावसामुळे रत्नागिरी जिल्ह्यातलं जनजीवन पूर्णपणे विस्कळित झालं. सर्वच नद्या दुथडी भरून वाहत असून काही नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. जगबुडी, वाशिष्ठी, काजळी, अर्जुना आणि कोदवली नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली. त्यामुळे खेड, चिपळूण आणि राजापूर शहरांना पुराचा वेढा बसला. वादळात अंगावर झाड कोसळल्यानं राजापूर तालुक्यातल्या प्रिंदावण इथं एका महिलेचा मृत्यू झाला. रत्नागिरी शहरात मुसळधार पावसाचा वीजपुरवठ्यावर परिणाम झाला. तालुक्यातल्या चांदेराई बाजारपेठेत सकाळीच पुराचं पाणी शिरलं. पावसाचा जोर कायम राहणार असल्यानं पूरस्थितीत लगेच सुधारणा होण्याची शक्यता कमी आहे.

गेले दोन दिवस सतत कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झालं. विजयदुर्ग खाडीनं धोक्याची पातळी गाठली असून यामुळे खारेपाटण सुख नदीला पूर आला आहे. पुराचं पाणी खारेपाटण बाजारपेठेत घुसण्याची दाट शक्यता आहे. पुराच्या पाण्यामुळे खारेपाटणहून चिंचवली आणि बंदरगावकडे जाणारे रस्ते पाण्याखाली गेले असून या मार्गावरील वाहतूक थांबविण्यात आली आहे. पावसाबरोबरच वादळी वारे असल्याने काही ठिकाणी झाडं उन्मळून घर, दुकानांवर पडून नुकसान झालं आहे. झाडं वीज वाहिन्यांवर पडल्यानं बरीच गाव अंधारात गेली आहेत. सावंतवाडीत मंडईवरचे पत्रे वाऱ्यानं उडून गेले.

रायगड जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे सावित्री, आंबा आणि कुंडलिका या नद्या धोक्याच्या खुणेवरून वाहत आहेत. पाताळगंगा, उल्हास, भोगावती, या नद्यांना देखील महापूर आले आहेत. सावित्री नदीचे पाणी महाड शहरात घुसले असून बाजारपेठ काल पाण्याखाली गेली. नागोठण्यात सखल भागात आंबा नदीचं पाणी शिरलं. लोकांना सुरक्षित ठिकाणी जाण्यास सांगण्यात आलं आहे. मुंबई - गोवा महामार्गावर माणगाव इथं मोठा वृक्ष कोसळल्यानं हा महामार्ग सायंकाळपासून बंद होता, पाच तास प्रयत्न केल्यानंतर अखेर हा वृक्ष रस्त्यातून दूर करण्यात आला. पाली इथल्या पुलावरून देखील पाणी वाहत आहे.

यंदाच्या पावसाळ्यात आतापर्यंत पावसानं तशी पाठच फिरवल्यानं चिंतेत असलेल्या पालघर जिल्ह्याला काल सकाळपासून सुरू झालेल्या दमदार पावसानं दिलासा दिला आहे. पालघर जिल्ह्यातल्या बोईसर, पालघर, सातपाटी, डहाणू, बोर्डी, चिखले, विक्रमगड, वसई-विरार, नालासोपारा या भागांत पावसानं जोरदार वाऱ्यांसह हजेरी लावली. पालघर जिल्ह्यातल्या अनेक भागांत झालेल्या मुसळधार पावसाचा फटका पालघर महावितरण विभागालाही बसला. मुसळधार पावसामुळे 55 वीज वाहिन्यांमध्ये तांत्रिक बिघाड होऊन 2 लाख 49 हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला होता.

पश्चिम महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी काल पावसाचा जोर होता. सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये अनेक ठिकाणी मुसळधार वृष्टी झाली. सांगली जिल्ह्यातील चांदोली परिसरात अतिवृष्टी झाल्याचं वृत्त आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भ मराठवाड्यात पावसाचा जोर काहीसा कमी असला तरी कालच्या पावसानं राज्याच्या सर्वच भागात हजेरी लावली.

**कोविड – राष्ट्रीय**

देशातील कोरोनाबाधितांच्या संख्येत काल सकाळपर्यंतच्या 24 तासात 52 हजार 50 नवीन बाधितांची भर पडली. त्यामुळे आतापर्यंतच्या बाधितांची एकंदर संख्या १८ लाख ५५ हजार 745 झाली आहे. सध्या यापैकी 5 लाख 86 हजार 289 रुग्ण उपचार घेत आहेत. काल सकाळपर्यंतच्या 24 तासात 44 हजार 306 रुग्ण बरे होऊन  घरी गेले. बरे झालेल्याची एकंदर संख्या बारा लाख 30 हजार 509 असून, रुग्ण बरे होण्याचा दर 66 पूर्णांक 31 शतांश टक्के आहे. देशात काल 803 रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली असून, आतापर्यंत कोविड-19 चे, 38 हजार 938 रुग्ण दगावले आहेत.

**कोविड राज्य**

राज्यात काल कोविड-19 चे 12 हजार 326 रुग्ण बरे होऊन घरी गेले. आजपर्यंत राज्यातले एकंदर 2 लाख 99 हजार 356 रुग्ण बरे झाले आहेत.  यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण 65 पुर्णांक 37 शतांश % झाले आहे. राज्यात काल 7 हजार 760 नवीन रुग्णांचं निदान झालं. त्यामुळे आतापर्यंतच्या कोरोनाबाधितांची संख्या 4 लाख 57 हजार 956 झाली. काल 300 रुग्णांच्या मृत्यूंची नोंद झाल्यानं कोविड 19 मुळे दगावलेल्यांची संख्या 16 हजार 142 झाली आहे.  सध्या राज्यातील मृत्यूदर 3 पुर्णांक 52 शतांश % आहे. राज्यात सध्या 1 लाख 42 हजार 151 रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

**अयोध्या भूमिपूजन**

राम मंदिराच्या भूमिपूजनासाठी उत्तर प्रदेशातली अयोध्या नगरी सजली असून तिथे अत्यंत उत्साहाचं वातावरण आहे. कालपासूनच या सोहळ्याच्या धार्मिक विधींना सुरुवात झाली आहे. काल झालेल्या दीपोत्सवानं संपूर्ण अयोध्या नगरी आणि शरयू नदीचा काठ उजळून निघाला होता. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर भाविकांनी कार्यक्रम स्थळी गर्दी न करता आपापल्या घरात दीप प्रज्ज्वलन करावं असं आवाहन  मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केलं होतं.  त्यामुळे परिसरातली घरंही दिव्यांनी झगमगून गेली आहेत.  भूमिपूजनाचा मुख्य कार्यक्रम आज दुपारी साडे १२ वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणार आहे. पंतप्रधान सर्वप्रथम हनुमान गढी मंदिरात दर्शन घेणार आहेत; त्यानंतर रामलल्लाचं दर्शन घेऊन भूमिपूजनाचा कार्यक्रम होईल.

**मंदिर स्वरूप**

अयोध्येतल्या आजच्या भुमीपूजनाची जशी अनेकांना प्रतिक्षा आहे तशीच हे मंदिर कसं असेल याबाबत उत्सुकताही आहे. हा वृत्तांत कदाचित ही उत्सुकता थोडी शमवू शकेल.....

*ज्या भव्य राम मंदिराचं भूमिपूजन होणार आहे ते मंदिर प्रत्यक्षात कसं असेल याबद्दलची माहिती राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र प्रतिष्ठानानं जाहीर केली आहे. मंदिराच्या उभारणीसाठी सुमारे 300 कोटी तर परिसराच्या सुशोभीकरणासाठी सुमारे 1 हजार कोटी रुपयांची गरज भासणार आहे. मुख्य मंदिराला 5 घुमट राहणार असून एक मुख्य कळस उभारला जाईल. मूळ आराखड्यात या 3 मजली मंदिराची उंची 141 फूट होती त्यात बदल करून आता ही उंची 161 फूट करायचं ठरलं आहे. मंदिरासाठी 360 कोरीव खांब उभे केले जातील. 16 फूट रुंद जिने ठेवले जाणार आहेत. श्रीराम अक्षर लिहिलेल्या सुमारे 2 लाख विटांनी या मंदिराचा पाया रचला जाईल. मंदिराला लागणार दगड खास राजस्थानातून मागवण्यात आला आहे . मुख्य मंदिराभोवती 4 छोटी मंदिरही उभारली जाणार आहेत. प्रभू रामचंद्रांचं हे मंदिर उभं राहिल्यानंतर देश विदेशातील पर्यटकांचही ते प्रमुख आकर्षण राहील यात शंका नाही.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी विनायक सोमणी पुणे.*

**अयोध्या**

अयोद्धेतील राममंदिर भूमिपूजन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील रामभक्तांनी जल्लोष सुरू केला आहे.तिथल्या उत्सवी वातावरणाचा हा वृत्तआंत आमच्या प्रतिनिधीकडून.

*पंचवटी परिसरातील मंदिरांमध्ये जय श्रीरामचा घोष घुमतो आहे. सामूहिक रामरक्षा आणि हनुमान चालिसा पठणानं वातावरण भक्तिमय झालं आहे.नाशिकमध्ये असलेल्या विविध देवदेवतांच्या मंदिरात धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ करण्यात आला. सोहळा निर्विघ्न पार पडावा यासाठी पंचमुखी हनुमान मंदिरात श्रीफळ वाढवून ध्वजपूजन करण्यात आलं. काल सकाळी पंचमुखी हनुमान मंदिरात साधू-महंतांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीराम, हनुमान यांच्या मूर्तींचं पूजन करण्यात आलं. त्यानंतर टाळ-मृदुंगांच्या गजरात भजन-कीर्तनाचा कार्यक्रम झाला. सध्या देशभरात कोरोना सावट असल्याने साधू-महंत आणि भाविकांना अयोध्येत भूमिपूजन सोहळ्यात सहभागी होता येणार नाही, त्यामुळे आज भुमिपूजनाच्यावेळी रामनामाचा गजर करत घंटानाद केला जाणार आहे.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी नाशिकहून संजय पाठक यांच्यासह माधवी कुलकर्णी, पुणे*

या प्रादेशिक बातम्या आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून प्रसारित करण्यात आल्या.
या बातम्या आपण न्यूज ऑन एआयआर ऍपवर देखील ऐकू शकता. ताज्या अपडेट्ससाठी आपण आम्हाला फॉलो करु शकता आमचं ट्विटर हॅंडल ऍट एआयआरन्यूज पुणे, फेसबुक पेज ऑल इंडिया रेडियो न्यूज पुणे आणि मराठी न्यूज पुणे ऑल इंडिया रेड़ियो या आमच्या युट्युब चॅनेलवर.

**चाकरमानी**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना 12 ऑगस्टपर्यंत कोकणात जाता येणार आहे. ICMR च्या निकषांप्रमाणे क्वारंटाईनचा कालावधी 10 दिवस करण्यात आला असून 12 ऑगस्टनंतर कोकणात जाणाऱ्यांनी स्वॅब चाचणी करणे बंधनकारक असणार आहे, असं परिवहन मंत्री अनिल परब यांनी म्हटलं आहे. यासाठी एसटीनं देखील 3 हजार बसेस तयार ठेवल्या असून त्यासाठी सामूहिक नोंदणी करता येणार आहे. सामूहिक नोंदणी केलेल्यांना त्यांच्या गावापर्यंत सोडण्याची सोय करण्यात आली आहे. यंदा एसटी 50 टक्के प्रवासी क्षमतेनं चालवण्यात येणार असून देखील त्यासाठी कोणतेही अतिरिक्त भाडे आकारण्यात येणार नाही. एसटीने जाणाऱ्या चाकरमान्यांना कोणत्याही इ-पासची गरज भासणार नाही, मात्र इतर वाहनांनी जाणार्यां ना लागेल असंही त्यांनी स्पष्ट केलं. कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांनी यंदा नियम पाळून गणेशोत्सव साजरा करावा असं आवाहन परिवहन मंत्र्यांनी केलं आहे.

**UPSC**

UPSC अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेतलेल्या नागरी सेवा परीक्षेचा निकाल काल जाहीर झाला. एकंदर 829 जणांची विविध नागरी सेवांसाठी निवड झाली असून प्रदीप सिंह यानं देशातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. जतीन किशोर द्वितीय तर प्रतिभा वर्मा हिनं तृतीय क्रमांक मिळवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी UPSC मध्ये यशस्वी झालेल्या युवकांचं अभिनंदन केलं आहे. नागरी सेवेचं अत्यंत रोमांचक आणि आनंददाई क्षेत्र आपली प्रतीक्षा करत आहे अस, पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

महाराष्ट्रातून पहिली आणि देशात 15 वी असलेल्या नेहा भोसले सह राज्यातील मंदार पत्की. आशुतोष कुलकर्णी, योगेश बावणे पाटील, आणि विशाल नरवाडे अशा पाच उमेदवारांनी या परीक्षेत पहिल्या शंभरात स्थान मिळवलं आहे.
निकालानंतर आकाशवाणीशी बोलताना मंदार पत्की म्हणाला....

पुण्यातल्या जयंत मंकले यानं अंधत्वावर मात करत या परिक्षेत 143 वा क्रमांक पटकावला. या यशाबद्दल आकाशवाणीशी बोलताना तो म्हणाला.

**शिवाजीराव निधन**

माजी मुख्यमंत्री काँग्रेसचे शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचं आज पहाटे पुण्यात निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. १९८५ ते १९८६ या काळात ते मुख्यमंत्री होते. लातुर जिल्ह्यात निलंगा इथं आज त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात येतील असं आमच्या बातमीदारानं कळवलं आहे.

**अल्काझी**

भारतीय रंगभूमीवरचे ज्येष्ठ दिग्दर्शक इब्राहीम अल्काझी यांचं काल नवी दिल्लीतल्या रुग्णालयात हृदयविकाराच्या झटक्यानं  निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. भारतीय रंगभूमीसाठी त्यांनी मोलाचं योगदान दिलं होतं. १९४० ते ५० च्या दशकातले  रंगभूमीवरच्या महत्त्वाच्या कलाकारांपैकी ते एक होते. राष्ट्रपती रामनाथ कोविंद, उपराष्ट्रपती एम व्यंकय्या नायडू , पंतप्रधान नरेंद्र मोदी,  केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी अल्काझी यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**हवामान**

बंगालच्या उपसागरावरील कमी दाबाचा पट्टा अधिक तीव्र झाला असून तो मध्य भारताच्या दिशेनं सरकत असल्यानं कोकण किनार्यातवरील मोसमी वार्यां ना बळ मिळालं आहे. त्यामुळे किनारपट्टीवर ताशी 50 ते 60 किलोमीटर वेगानं वाहणारे वारे दमदार पाऊस घेऊन आले आहेत. कोकणातला हा पावसाचा जोर उद्यापर्यंत कायम राहील. तोपर्यंत तुरळक ठिकाणी अतिवृष्टीचा धोका आहे. या वार्यांचा प्रभाव काल पश्चिम महाराष्ट्रातही जाणवला मात्र आज पासून तो काहिसा कमी होईल. हवामान खात्याच्या अंदाजानुसार आज कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात सर्वत्र तर मराठवाड्यात अनेक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.
पण यानंतर सकाळी 10 वाजून 10 मिनिटांनी ऐका, कोरोना संकटाशी सुरु असलेल्या युद्धाच्या, राज्यभरातल्या बातम्या कोरोना महाराष्ट्र या विशेष बातमीपत्रात.
तुम्ही मात्र शक्यतो  घरीच राहा, निरोगी राहा आणि विश्वासार्ह बातम्यांसाठी ऐकत राहा, आकाशवाणी, नमस्कार.